# महाराष्ट्र शासन

Email ID: neela.ranade@nic.in
Phone No.: (०२२) २२०१४४१९

क्र. जीपीडीपी २०१८/ प्र.क्र. ८९ / पं.रा.६
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन इमारत,
२५, मर्झबान पथ, मुंबई-४००००१.
दिनांक : १४ नोव्हेंबर, २०१८.

प्रति,

उपायुक्त ( विकास )
विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व.

**विषय - सबकी योजना सबका विकास अभियान राबवून ग्राम पंचायत विकास आराखडे अंतिम करणेबाबत...**

**संदर्भ** - १) **शासन निर्णय क्र. जीपीडीपी**-२०१८/**प्र.क्र.**५१/**पंरा**-६, **दि.** ०६/०९/२०१८.
२) **शासन पत्र क्र. जीपीडीपी**-२०१८/**प्र.क्र.**५१/**पंरा**-६, **दि.** ०७/०९/२०१८.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रान्वये सबकी योजना सबका विकास अभियान राबवून ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करण्याबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेतला असता, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामधील जबाबदा-यांबाबत अद्यापही मोठा संभ्रम असल्यामुळे अभियानाच्या प्रगतीवर मोठा परिणाम होत आहे. यास्तव उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रा.पं.) व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या जबाबदा-यांची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात येत आहे

**प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**

१) **Gpdp.nic.in** या वेबपोर्टलवर तालुकास्तरीय नोडल अधिका-यांचे लॉगिन आयडी तयार करून देणे.
२) मिशन अंत्योदय अंतर्गत पायाभूत सर्वेक्षण, ग्रामपंचायतनिहाय **Facilitator** नियुक्त्या व प्रशिक्षण यासाठी जिल्हा स्तरावर नोडल अधिकारी म्हणून काम पाहणे व तालुकास्तरीय अधिका-यांकडून ही माहिती वेबपोर्टलवर अपलोड करणे.
३) **Facilitator** मार्फत बेसलाईन सर्वे पूर्ण करून घेणे ( **MA Mobile App** ), **data upload** करणे, **Poverty Reduction Plan** तयार करून ग्रामसभेत मांडणे तसेच ग्रामसभेमध्ये अनु.जाती-जमाती, महिला, अपंग इ. वंचीत घटकांना सहभागी करून घेणे आणि विहित नमुन्यातील अहवाल सादर करणे या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करणे.
४) मिशन अंत्योदय सर्वेक्षण ग्रामसभेमध्ये प्रमाणित ( **Validate** ) करून घेणे.
५) मिशन अंत्योदय बेसलाईन सर्वे पूर्ण करून **gpdp.nic.in** या वेबपोर्टलवर अपलोड करणे.

६) **Facilitator Feedback Details** प्राप्त करून अपलोड करणे.

७) **Facilitator** च्या नियुक्त्या प्रत्येक ग्रामपंचायत निहाय करून **gpdp.nic.in** या वेबपोर्टलवर यांचा डेटा **GP level** ला **Mapping** करणे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)

१) **Frontline Worker** च्या नियुक्त्या प्रत्येक ग्रामपंचायत निहाय करून **gpdp.nic.in** या वेबपोर्टलवर यांचा डेटा **GP level** ला **Mapping** करणे.

२) विशेष ग्रामसभांचे वेळापत्रक ग्रामपंचायतनिहाय निश्चित करून त्यानुसार ग्रामसभा आयोजित करणे व ग्रामसभांचे वेळापत्रक वेबसाईटवर अपलोड करणे.

३) विशेष ग्रामसभेचे ग्रामपंचायतनिहाय वेळापत्रक निश्चित करून त्यास स्थानिक स्तरावर प्रसिध्दी देणे.

४) दिनांक **२ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१८** या कालावधीतील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या विशेष ग्राम सभांना उपस्थित राहणा-या अधिकारी/कर्मचा-यांनी त्यांना नेमून दिलेल्या ग्रामपंचायतींच्या ग्राम सभांना वेळापत्रकानुसार उपस्थित राहणेबाबत सूचना देणे. त्याचप्रमाणे प्रत्येक विभागाकडून विहित नमुन्यातील अहवाल संबंधित ग्रामसभेत सादर करणेबाबत सूचना देणे.

५) प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेसाठी तालुकास्तरीय विस्तार अधिका-यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करणे.

६) सन २०१९-२० चा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेबाबतच्या निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व या मोहिमेची सांगड घालून अंमलबजावणी करणे.

७) ग्रामपंचायतीमध्ये विहित नमुन्यातील माहिती फलक लावणे.

८) ग्रामसभा बैठकीचे व माहिती फलकांचे जिओ-टॅग फोटोग्राफ अपलोड करणे.

९) केंद्र शासनाने ग्रामपंचायतीसाठी विकसित केलेल्या विविध आज्ञावली (www.gpdp.nic.in) अद्ययावत ठेवणे.

**संबंधितांनी या जबाबदा-या योग्य रितीने आणि विहित वेळेत पार पाडण्याबाबत दक्षता घ्यावी. उपरोक्त नमूद जबाबदारी पार पाडण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधितांना सूचना द्याव्यात ही विनंती.**

सहपत्र: वरीलप्रमाणे.

आपली,

( नीला रानडे )

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**